MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

महापारेषण समाचार

वर्ष : १८ अंक : २ पाने : ८ फेब्रुवारी-मार्च २०२३ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :

प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

महापारेषणने कम्युनिकेशन नेटवर्क ऑप्टिकल ग्राउंड वायर (OPGW) साठी स्टरलाइट सोबत MTCIL नावाचा संयुक्त उपक्रम सुरू केला आहे. हा महापारेषणच्या डेटा दूरसंचारचा कणा आहे. सध्या २५ जिल्हे आणि २०८ शहरांमध्ये (नऊ प्रमुख शहरांसह) MTCIL फायबर नेटवर्क सुमारे ३,४०० कि.मी. पसरले आहे. त्यात ९ हजार ४२७ मनोरे आहेत. JV कंपनीच्या कॅपेक्स बोजा कमी झाला आहे. परिणामी, ग्राहकांवरील शुल्काचा बोजा कमी झाला आहे.

- सांघिक भावनेने काम करा
- वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्या
- कामे वेळेवर करा
- अखंडित वीजपुरवठा ठेवा

नवीकरणीय ऊर्जेचा राष्ट्रीय पॉवर ग्रीडमध्ये प्रवाह सुलभ करण्यासाठी केंद्र शासन, जागतिक बँक आणि KfW व्दारे अर्थसहाय्यित ग्रीन एनर्जी कॉरिडॉर योजना राबविण्यात येत आहे. GEC प्रकल्पांर्गत १.२७ अब्ज रूपयांच्या गुंतवणुकीसाठी १८ वाहिन्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यातील १५ वाहिन्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित तीन वाहिन्यांचे काम सुरू आहे. तसेच GEC अंतर्गत ४१४.६ दशलक्ष रूपयांच्या गुंतवणुकीत ३७ बे चे काम प्रगतिपथावर आहे. जून-२०२३ पर्यंत सर्व कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे.

महापारेषणने पारेषण प्रणालीची उपलब्धता ९९ टक्क्यांवर (MERC मापदंड-९८ टक्के) आणि पारेषण हानी ३.१९ टक्के (MERC मापदंड-४.८५) ठेवली आहे. कंपनी MERC ने निश्चित केलेल्या मानक ऑपरेटिंग पॅरामीटर्सपेक्षा चांगली कामगिरी करत आहे. तसेच महापारेषणने पारेषण पायाभूत सुविधांची योग्य स्थापना आणि व्यवस्थापन केल्यामुळे २८ हजार ८४५ मेगावॅटच्या विजेचे विक्रमी पारेषण केले आहे.

प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी महापारेषणने केलेले प्रयत्न आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी महापारेषणने केलेले सर्व उपक्रम लक्षात घेऊन नामांकित CBIP ने राज्य पारेषण क्षेत्रातील सर्वोत्तम कंपनी म्हणून महापारेषणला पुरस्कार दिला आहे, ही बाब आपल्या सर्वांसाठीच गौरवाची आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सांघिक कार्यामुळेच (Team Work) हा पुरस्कार महापारेषणला मिळाल्याची माझी भावना आहे. मा. केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. आर. के. सिंह यांच्या हस्ते हा पुरस्कार मी स्वीकारला.

तसेच श्री. वसंत पाटील, वाहिनी प्रकल्प उपविभाग यांना ऊर्जा आणि नवीकरणीय क्षेत्राच्या विकासातील उत्कृष्ट योगदानासाठी CBIP 'बेस्ट यंग इंजिनिअर' पुरस्कार मिळाला. वीज गुणवत्ता सुधारणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासास चालना देणे, विद्यमान ३३/११ के. व्ही. धडगाव उपकेंद्राची व्होल्टता स्तर वाढविण्यासाठी आणि १३२/३३ के. व्ही. धडगाव उपकेंद्र उभारण्यासाठी १३२ के. व्ही. तळोदा उपकेंद्र ते धडगाव उपकेंद्रापर्यंत वाहिनी उभारण्यासाठी करण्यात आली. तथापि, तळोदा उपकेंद्र ते धडगावपर्यंत १३२ के. व्ही. लाईनचे बांधकाम करणे हे अत्यंत आव्हानात्मक काम होते. कारण ते सातपुडा डोंगरात होते आणि घनदाट जंगल असलेल्या प्रचंड पर्वत आणि दऱ्यांतून १३२ के. व्ही. चे टॉवर बांधणे जोखमीचे होते. प्रकल्प पूर्ण झाल्यावर व्होल्टेड प्रोफाइल १७.२ के. व्ही. वरून ३३.५ के. व्ही. पर्यंत वाढले आहे. परिणामी, ट्रिपिंग कमी झाले आहे. या प्रकल्पाचे भांडवलीकरण ४९ कोटी रूपये महसूल आणि एकूणच आर्थिक वाढीच्या दृष्टीने आदिवासी स्थानिकांना आणि परिसरातील नागरिकांना फायदा झाला आहे.

दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कराड परिमंडळातील श्री. दिगंबर पुजारी यांना ऑटोमेशन श्रेणीत 'बेस्ट यंग पॉवर इंजिनिअर' हा पुरस्कार मिळाला. या प्रकल्पाच्या कामात, उपकेंद्र ऑटोमेशनसाठी विद्यमान ४०० के. व्ही., २२० के. व्ही. आणि १३२ के. व्ही. उपकेंद्र SAS (SCADA) मध्ये सुधारणा, RTU च्या जागी सुटे गेटवे पीसीचा वापर, गेटवेचे SAS उपकेंद्राचे एकत्रीकरण आणि अपग्रेडेशन अभियंत्यांनी केले. यामुळे महापारेषणला सुमारे ९६ लाख रूपये खर्च वाचविता आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार व सल्ल्यानुसार आपले कामकाज वेळेवर करून वरिष्ठांना तसे अवगत करावे. जेणेकरून महाराष्ट्रातील नागरिकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा होईल. गरिकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा होईल.

शुभेच्छांसह..!

– दिनेश वाघमारे
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

गौरव

केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाचे पुरस्कार वितरण

महापारेषणला सर्वोत्तम राज्य पारेषण कंपनी म्हणून पारितोषिक

Follow us on :

नवी दिल्ली येथे केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाने (सीबीआयपी) नुकतेच विविध पुरस्कारांचे वितरण केले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला (महापारेषण) देशातील सर्वोत्तम राज्य पारेषण कंपनी म्हणून पारितोषिक मिळाले. केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. आर. के. सिंह यांच्या हस्ते महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे व महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

याप्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाचे (सीबीआयपी) अध्यक्ष श्री. घनश्याम प्रसाद यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

अखंडित वीज पारेषण करताना वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वीजहानी कमीत-कमी ठेवणे, उच्च व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल उपकेंद्रांची उभारणी, भौगोलिक माहिती प्रणाली व अति उच्च दाब केबलचा वापर करणे, दुर्गम भागात विजेची देखभाल करण्यासाठी ड्रोनचा वापर, दरवर्षी वीजजाळ्यांची उभारणी करणे, देशात सर्वात जास्त भार (Load MW) वर्षभरात सर्वात जास्त वीज पारेषण करणे यासाठी हे पारितोषिक मिळाले आहे.

तसेच या सांघिक पुरस्काराव्यतिरिक्त महापारेषणला पाचपैकी दोन वैयक्तिक पुरस्कार प्राप्त झाले. यामध्ये उपकार्यकारी अभियंता श्री. वसंत पाटील यांना महापारेषण जळगाव विभागातील १३२ के. व्ही. तळोदा-धडगाव वाहिनी डोंगरदऱ्यात असूनही प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मनोरे उभे करून वाहिनीची कामे वेळेवर पूर्ण करुन धडगाव येथे पूर्ण क्षमतेने उपकेंद्र कार्यान्वित केल्याबद्दल त्याना 'बेस्ट यंग पॉवर इंजिनिअर' पुरस्कार मिळाला. दुसरा वैयक्तिक पुरस्कार महापारेषण कोल्हापूरचे उपकार्यकारी अभियंता श्री. दिगंबर पुजारी यांना डिजिटल व ऑटोमेशन क्षेत्रात उच्च तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे 'बेस्ट यंग पॉवर इंजिनिअर' म्हणून वैयक्तिकरित्या पारितोषिक मिळाले.

नवी दिल्ली : येथे केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळातर्फे महापारेषणला देशातील सर्वोत्तम राज्य पारेषण कंपनी म्हणून पारितोषिक देण्यात आले. केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. आर. के. सिंह यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे व महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी.

यशाचे श्रेय टीमवर्कला

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय टीमवर्कला दिले आहे. सातत्यपूर्ण कामगिरी अभियंते, अधिकारी व कर्मचारी यांच्या सांघिक कामांमुळेच महापारेषणला हे पुरस्कार मिळाल्याचे सांगितले. भविष्यातही महापारेषणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी सातत्यपूर्ण कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावतील, असा विश्वास व्यक्त केला.

थेट-भेट

विविध कामांचा घेतला आढावा

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला भेट

Follow us on :

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी ऐरोली येथील महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला भेट दिली. यावेळी MTAMC प्रकल्पातील कंट्रोल सेंटर येथे भेट देऊन विविध कामांचा आढावा घेतला.

या प्रकल्पांतर्गत ४०० के. व्ही. च्या नऊ ग्रहणकेंद्रांचे ऍटोमेशनच्या कंट्रोल रूममध्ये इंटिग्रेशनचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यावेळी श्री. दिनेश वाघमारे यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीबद्दल समाधान व्यक्त केले. पारेषण प्रणालीत चाळीस वर्षापूर्वी कार्यान्वित झालेल्या ग्रहण केंद्रांचे SCADA, RAS, AFAS, VMS या प्रणालीव्दारे डिजिटायझेशन करण्याचे काम पूर्णत्वास आणल्यामुळे सर्वांचे कौतुक केले. हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावा, अशा सूचना केल्या. यावेळी कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (आय.टी.) श्री. नागसेन वानखेडे उपस्थित होते. कार्यकारी संचालक (प्र.) श्री. शशांक जेवळीकर यांनी MTAMC प्रकल्पाचे ध्येय व उद्दिष्ट्ये सविस्तरपणे सांगितली. कार्यकारी अभियंता (ऍटोमेशन) श्री. सुनिल बनसोड यांनी प्रकल्पाची प्रगती, आव्हाने व उपलब्धी याबाबत माहिती दिली. कार्यकारी अभियंता (प्रोटेक्शन) श्री. विलास बोरले यांनी प्रकल्पाला आवश्यक असलेल्या दूरसंचार प्रणालीची माहिती दिली. प्रणाली विश्लेषक श्री. राज राठोड यांनी प्रकल्पांतर्गत सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. श्री. भालचंद्र काळे श्री. सूरज पाटील, श्री. संतोष दुधावडे यांनी MTAMC मधील प्रणालीची माहिती दिली. सहाय्यक अभियंता श्री. नितीन आव्हाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मानले.

ऐरोली : येथील महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला (MSLDC) महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी भेट दिली. याप्रसंगी कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (आय.टी.) श्री. नागसेन वानखेडे, कार्यकारी संचालक (प्र.) श्री. शशांक जेवळीकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी वर्ग.

सर्वांसाठी वीज

शहा : महापारेषण कंपनीच्या १३२ के. व्ही. शहा उपकेंद्राचे लोकार्पण करताना महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. अजित पवार. शेजारी सिन्नरचे आमदार श्री. माणिकराव कोकाटे, मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. अनिल भारसाकळे, श्री. माणिक गुट्टे व अन्य अधिकारी. वरिष्ठ अधिकारी वर्ग.

▶ शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा होणार

१३२ के. व्ही. शहा उपकेंद्र कार्यान्वित

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या १३२ के. व्ही. शहा उपकेंद्राचे लोकार्पण महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. अजित पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सिन्नरचे आमदार श्री. माणिकराव कोकाटे उपस्थित होते.

यावेळी अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिकचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. अनिल भारसाकळे, श्री. माणिक गुट्टे, कार्यकारी अभियंता श्री. अनंत पाठक, श्री. ललित पाटील, श्री. विनोद ढोरे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

१३२ के. व्ही. शहा उपकेंद्रामुळे शहा परिसरातील गावे आणि सिन्नर व कोपरगाव तालुक्यातील गावे यांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे. त्यामुळे प्रत्येक ग्राहकाला योग्य व नियमित दाबाने अखंडित वीजपुरवठा होणार आहे. कोविड-१९ चे संकट व त्या अनुषंगाने कामगार, साधनसामुग्री, भांडवल यावर मात करून महापारेषणने वेळेमध्ये या उपकेंद्राचे काम पूर्ण केले. यासाठी सिन्नर व कोपरगाव परिसरातील शेतकऱ्यांनी व नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले.

World Women`s Day

▶ विविध कार्यक्रमांचे आयोजन

वाशी परिमंडळात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

Follow us on :

वाशी परिमंडळात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

महिला दिनाचे औचित्य साधून परिमंडळांतर्गत कार्यरत असलेल्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 'स्त्री-पुरूष समानतेसाठी डिजिटल नवकल्पना आणि तंत्रज्ञान व्यवस्था' या विषयावर श्रीमती भाग्यश्री घोसाळकर यांचे दूरदृश्य प्रणालीव्दारे ऑनलाईन सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुमारे दोनशे महिलांनी आपला सहभाग नोंदविला.

वाशी : परिमंडळात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं) डॉ. शितल गेडाम यांच्यासह महिला अधिकारी.

याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी वाशी परिमंडळांतर्गत कार्यरत महिला अधिकारी-कर्मचारी आपापली जबाबदारी सक्षमपणे सांभाळत असल्याचे सांगितले. तसेच महिला कर्मचाऱ्यांना आपल्या कार्यस्थळी आत्मविश्वासाने काम करून महापारेषण कंपनीचा नावलौकिक वाढविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. वाशी परिमंडळाच्या सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) डॉ. शितल गेडाम यांनी परिमंडळांतर्गत कार्यरत महिला अधिकारी यांनी मार्गदर्शन करताना आपले ध्येय निश्चित करून त्यावर लक्ष केंद्रित करा, शिस्तबध्दता अंगी बाळगा, आत्मविश्वास निर्माण करा, आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवा, आपल्या हक्कासाठी लढायला शिका हे पाच महत्त्वाचे गुण आपण काम करीत असल्याचे ठिकाणी जोपासण्याविषयी मार्गदर्शन केले.

श्रीमती भाग्यश्री घोसाळकर यांनी महिला सक्षमीकरण, आधुनिक विश्वातील महिलांसाठी असलेली आव्हाने, तंत्रज्ञानाचा वापर याविषयी उपस्थित महिलांना प्रबोधन केले. कर्तबगार महिलांचा प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित पुस्तकांचे वाटप अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. मोहन ननवरे यांच्या हस्ते करण्यात आले.

महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे फेब्रुवारी-मार्च २०२३

नियुक्ती

अ.क्र.	नाव (सर्वश्री)	पद	पदस्थापनेचे ठिकाण	दिनांक
१	अशोक सगरे	अधीक्षक अभियंता (पारेषण)	संरक्षण, स्वयंचलन व दूरसंचरण मंडळ, कराड	२७.३.२०२३
२	संजीवकुमार बड्डेला	अधीक्षक अभियंता (पारेषण)	प्रकल्प योजना विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई	२५.०३.२०२३
३	श्रीकृष्ण नवलाखे	अधीक्षक अभियंता (पारेषण)	अउदा प्रकल्प मंडळ, कोल्हापूर	२३.०३.२०२३
४	प्रमोद भोसले	अधीक्षक अभियंता (पारेषण)	अउदा संवसु मंडळ, पुणे	२४.०३.२०२३

महिलांचा जागर

महापारेषणमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

महिला सक्षमीकरणासाठी हक्क आणि अधिकाराचा वापर करा : श्री. दिनेश वाघमारे

Follow us on :

``महापारेषण कंपनीत महिला जिद्दीने व सचोटीने काम करत आहेत, हे कौतुकास्पद आहे. सक्षमीकरणासाठी महिलांनी आपल्या हक्क आणि अधिकाराचा वापर केला पाहिजे``, असे प्रतिपादन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त महापारेषणच्या वतीने प्रकाशगड येथे नृत्याध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, जुईली वाघ, श्री. भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. अभय रोही, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. किर्ती कुळकर्णी, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते.

मुंबई : जागतिक महिला दिनानिमित्त महापारेषण कंपनीने आयोजिलेल्या नृत्याध्या कार्यक्रमात बोलताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे.

श्री. दिनेश वाघमारे म्हणाले, ``महापारेषणमध्ये महिलांचे प्रमाण सुमारे ४० टक्के आहे, ही अभिनंदनाची बाब आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमांतून महिलांना त्यांचे हक्क मिळवून दिले. नोकरीत महिलांना प्रसुती रजा व विधवांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. केंद्र व राज्य शासनही महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार घेत आहे. महिलांना मिळणाऱ्या आरक्षणाबाबत अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. महापारेषणनेही कामकाजाच्या ठिकाणी विशाखा समिती स्थापन करून महिलांना न्याय देण्याचे काम केले आहे.`` प्रारंभी श्री. वाघमारे यांनी जागतिक महिला दिनाची सुरूवात कशी झाली, याबद्दल सांगून महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच नृत्याध्या हा महिलांसाठी चांगला सांस्कृतिक कार्यक्रम आहे. डॉ. आदिती देशकर-आजरेकर व श्री. प्रसाद आजरेकर यांच्यासह त्यांच्या टीमचे अभिनंदन केले. सुरूवातीला महिला अधिकारी व कर्मचारी यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर डॉ. आदिती व प्रसाद आजरेकर आणि सहकारी यांचा कथ्थक नृत्य आणि तबला वादनाचा मनोरंजनात्मक कार्यक्रम झाला. संवादिनी व गायन श्री. मनोज देसाई यांनी केले. राघवेंद्र बालिगा यांनी बासरीची साथ दिली. डॉ. आदिती आजरेकर यांच्या शिष्या यांनीही कथ्थक व नृत्य सादर केले. संचालक (मा. सं.) श्री. सुगत गमरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्री. तेजस टिकले व कविता महाजन यांनी केले. श्रीमती भारती कांबळे यांनी आभार मानले.

मुंबई : जागतिक महिला दिनानिमित्त महापारेषण कंपनीने आयोजिलेल्या नृत्याध्या कार्यक्रमात उपस्थित महिला अधिकारी व कर्मचारी.

क्षणचित्रे...

अमरावती : येथे आयोजिलेल्या ४५ व्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या राज्यव्यापी अधिवेशनाप्रसंगी डावीकडून महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) सर्वश्री मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, संजय खाडे, महापारेषणचे संचालक (मा.सं.) सुगत गमरे, विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, अरविंद भादीकर, भूषण कुलकर्णी, प्रवीण बागूल, सरचिटणीस संजय खाडे, संघटन सचिव प्रवीण काटोले व अन्य मान्यवर.

मराविमं अधिकारी संघटनेच्या ४५ व्या अधिवेशनाचे थाटात उद्घाटन

अधिकारी संघटनेच्या सभासदांचे ऊर्जाक्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान : सुगत गमरे

Follow us on :

''महापारेषण आणि महानिर्मिती या ऊर्जाक्षेत्रातील कंपन्यात वित्त व लेखा, मानव संसाधन, माहिती व तंत्रज्ञान, औद्योगिक संबंध, दक्षता व सुरक्षा, जनसंपर्क आणि विधी या महत्वाच्या विभागाचे सदस्य आहेत. महाराष्ट्र विद्युत मंडळ अधिकारी संघटनेची सदस्य संख्या ही या कंपन्यातील एकूण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत अल्प असली तरी अधिकारी संघटनेच्या सभासदांचे ऊर्जाक्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान असून व्यवस्थापनात त्यांची भूमिका या कंपन्यांसाठी श्वासाचे काम करते'', असे प्रतिपादन महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी केले.

अमरावती प्राईम पार्क येथे झालेल्या ४५ व्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या राज्यव्यापी अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरून श्री. सुगत गमरे बोलत होते. या अधिवेशनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त अमरावती डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी महावितरणचे कार्यकारी संचालक सर्वश्री अरविंद भादीकर, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) मंगेश शिंदे, अधिकारी संघटनेचे अध्यक्ष प्रविण बागूल, सरचिटणीस संजय खाडे, संघटन सचिव प्रवीण काटोले उपस्थित होते.

अमरावती : येथे आयोजिलेल्या ४५ व्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या राज्यव्यापी अधिवेशनात बोलताना महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे.

यावेळी बोलताना श्री. सुगत गमरे म्हणाले, ''राज्यातील ऊर्जा क्षेत्रातील महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्याचे काम हे देशात सर्वोत्तम आहे. ऊर्जाक्षेत्रात पुढील काळात ५० हजार कोटींची कामे होणार आहेत. त्यातून ग्राहकांप्रती, कर्मचारी-अधिकाऱ्यांची जबाबदारी मोठी वाढणार आहे. यासाठी पदभरतीही मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे.''

यावेळी अमरावतीचे विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, श्री. अरविंद भादीकर, श्री. भूषण कुलकर्णी, श्री. भरत पाटील यांनी आपले विचार मांडले. कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, कर्मचाऱ्यांवर असलेला अतिरिक्त कामाचा भार, पदोन्नती, नवीन पदभरती, अपग्रेडेशनसारखे प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याची जबाबदारी ही प्रशासनाची असल्याचे मत सरचिटणीस श्री. संजय खाडे यांनी व्यक्त केले. दोन दिवसीय या अधिवेशनाची सांगता पतसंस्थेच्या कामकाजानंतर झाली. कार्यक्रमाला राज्यभरातून महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील राज्यभरातील सुमारे पाचशे अधिकारी या अधिवेशनाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री वानखेडे यांनी केले. आभार सचिव श्री. फुलसिंग राठोड यांनी मानले.

'महापारेषण समाचार'
आता डिजिटल स्वरूपात...
सोबतचा QR कोड स्कॅन करा आणि वाचा अंक
महापारेषण समाचार

स्वराज्यरक्षक

अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

मुंबई : येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून व्यवस्थापक (मा.सं.) सर्वश्री पारस सवाई, अधीक्षक अभियंता सचिन खडगी, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) मंगेश शिंदे, संचालक (मा.सं.) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) सुधीर वानखेडे, शिष्टाचार अधिकारी सतिश जाधव, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी सुरूवातीला संचालक (मा.सं) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता श्री. सचिन खडगी, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, व्यवस्थापक (मा. सं.) श्री. पारस सवाई यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Vigilance Awareness

कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती वर्षा शिंदे यांचे मार्गदर्शन

कराड परिमंडळामध्ये दक्षता जनजागृती प्रशिक्षण

Follow us on :

कराड परिमंडळातील अधिकारी, स्थानिक खरेदी-विक्री अधिकारी (LPO) व तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील वर्ग-१ ते ३ मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता दक्षता जनजागृती प्रशिक्षण घेण्यात आले. हे प्रशिक्षण सांघिक कार्यालयातील कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती वर्षा शिंदे यांनी दिले.

प्रशिक्षणाव्दारे सुरक्षा व दक्षता विभागाची गरज का आहे, सुरक्षा व दक्षता विभागाची कार्यपध्दती तसेच क्षेत्रीय कार्यालयाकडून कोणती प्रकरणे सदर विभागाकडे पाठविण्यात यावीत, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच दैनंदिन काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांना दक्षताच्या (Vigilance) च्या अनुषंगाने कोणती काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सेवाविनियम, सर्व विभागीय परिपत्रके, नियमावली, कंत्राटदार कायदा, स्पर्धा कायदा, केंद्रीय दक्षता आयोग (CVC) मार्गदर्शक तत्त्वे याबद्दल माहिती दिली.

या प्रशिक्षणास मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार, अधीक्षक अभियंता श्री. चिदाप्पा कोळी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.)/ सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) तसेच कार्यकारी अभियंता व परिमंडळ, संवसु मंडळ, कराड अंतर्गत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कराड : येथील परिमंडळामध्ये दक्षता जनजागृती प्रशिक्षण घेण्यात आले. याप्रसंगी सांघिक कार्यालयातील कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती वर्षा शिंदे व समोर उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

आमच्याशी कनेक्टेड रहा

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco

मुंबई : महापारेषणच्या सांघिक कार्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, डॉ. सुमेधा साळुंखे, श्री. दीपक कुन्नुरे यांच्यासह विद्यार्थी.

महापारेषणची कार्यपध्दती व विविध उपक्रमांची घेतली माहिती

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांची महापारेषणला भेट

Follow us on :

मुंबई येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली. महापारेषण कंपनीचे कामकाज, कार्यपध्दती व जनसंपर्क विभागास भेट देऊन विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरूवातीला जनसंपर्क विभागाला भेट दिली. प्रारंभी महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी सर्वांचे स्वागत केले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणने विविध उपक्रम कसे प्रभावीपणे राबविले आहेत, याची माहिती दिली. महापारेषण कंपनीने आधुनिक तंत्रज्ञान वापरून वीजवहन व वीजपुरवठा सुरळीत ठेवला आहे. त्यामुळे महापारेषणला कंपनीला विविध पुरस्कार मिळाले आहेत. महापारेषणने कोरोना काळात व तौक्ते, निसर्ग चक्रीवादळात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कसे सांघिक भावनेने काम केले, याबद्दल ध्वनिचित्रफित विद्यार्थ्यांना दाखविली. तसेच जनसंपर्क विभागाचे 'महापारेषण समाचार' मासिक, दैनंदिनी व दिनदर्शिकेविषयी माहिती दिली.

मुंबई : महापारेषणच्या लायब्ररीची माहिती देताना जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे.

महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी महापारेषणची संपूर्ण यंत्रणा, मनुष्यबळ, कामकाज व कार्यपध्दतीची माहिती दिली. पत्रकारितेतील विद्यार्थ्यांनी भविष्यात सामान्य नागरिक केंद्रबिंदू मानून सकारात्मक पत्रकारिता करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा. सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक श्री. महेश आंबेकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या डॉ. सुमेधा साळुंखे, श्री. दीपक कुन्नुरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी शेवटी आभार मानले.

विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी भारावले

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) व संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले सुसज्ज व सर्वसुविधायुक्त वाचनालय व व्यायामशाळा पाहून विद्यार्थी भारावले. महापारेषण भविष्यात ई-लायब्ररी सुरू करणार असल्याचे सांगताच पीएच.डी. करत असणारे विद्यार्थी श्री. दीपक कुन्नुरे यांनी हा उपक्रम खूपच स्तुत्य असून आपणही महापारेषणला दोन हजार रूपयांची पुस्तके मोफत देणार असल्याचे जाहीर केले.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO for Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Jyotirling Enterprises :** 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.